# मुंबई विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

वेबसाईट :-www.nssmu.org
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.**

पत्र.क्र. रासेयो/ईसीडी/२०२४-२५/१०६१
दिनांक : ०५.१२.२०२४

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत मुंबई विद्यापीठ अधिनस्त सर्व महाविद्यालये.

**विषय : राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयीन ऐच्छिक राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक मुली/महिलांच्या केसांची एक बट दान करण्याबाबत उपक्रम.**

**संदर्भ** : रासेयो, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.रासेयो-२०२४/प्र.क्र. ८१/रासेयो, दिनांक ०४ डिसेंबर, २०२४ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त मा. राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन यांचे कडून प्राप्त पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, हिन्द आयन फाऊंडेशन, मानखुर्द (पू.) मुंबई यांच्यावतीने कर्करोगावरील उपचारामूळे डोक्यावरील केस गळून गेले आहेत, अशा कॅन्सरग्रस्त रूग्णांकरीता डोक्यावरील केसांचा विग तयार करण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील रासेयो स्वंयसेवक मुली/महिला आपल्या केसांची एक बट दान करतील अशी संकल्पना हिन्द आयन फाऊंडेशन यांनी व्यक्त केली आहे.

सदर उपक्रम दिनांक १५ फेब्रुवारी, २०२५ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे आयोजित करण्यात येणार असुन या उपक्रमांसाठी आपल्या महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक मुली/महिला यांना आपल्याकेसांची एक बट कॅन्सरगस्ट रूग्णांसाठी डोक्यावरील केसांचा विग तयार करण्यासाठी दान करण्याबाबत उपरोक्त संदर्भापत्रानुसार आव्हान करण्यात आले आहे.

दिनांक १५ फेब्रुवारी, २०२५ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे आयोजित उपक्रमाबाबतमाहिती व मार्गदर्शनासाठी उपरोक्त संदर्भ पत्रामध्ये दिलेले संपर्क व्यक्ती प्रा. चित्रा लेले, सहा. प्राध्यापक,एस. एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई यांचे मोबाईल क्र.९९७५६३९४९७ यांचेशी संपर्क साधावा.

तरी या पत्राद्वारे आपणांस आव्हान करण्यात येते की, जास्तीत जास्त मुली/महिला स्वयंसेवकांना वरील उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, ही विनंती.

**आपला**

**सुशील शिंदे**
**विशेष कार्य अधिकारी, (रा.से.यो.)**

**सोबत : उपरोक्त संदर्भ पत्र.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.**
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-400 001.

ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र. 022-22679565

**क्रमांक: रासेयो-202४/प्र.क्र.81/रासेयो** **दिनांक : ४ डिसेंबर, 2024**

**प्रति,**
**कार्यक्रम समन्वयक तथा संचालक**
रासेयो संलग्नित, मुंबई विद्यापीठ, मुंबई, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई, हैद्राबाद (सिंध) नॅशनल कॉलेजिएट विद्यापीठ, मुंबई
डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई, भारती विद्यापीठ विश्वविद्यालय, पुणे

**विषय : उपरोक्त विद्यापीठातील व विद्यापीठांतर्गत महाविद्यालयातील ऐच्छिक मुली/महिलांच्या केसांची एक बट दान करण्याबाबतच्या उपक्रमाबाबत...**

उपरोक्त विषयास अनुलक्षून रासेयो कार्यक्रम समन्वयक तथा संचालक यांना सूचित करण्यात येते की, हिन्द आयन फाऊंडेशन, मानखुर्द (पू.), मुंबई यांच्यावतीने कर्करोगावरील उपचारामूळे डोक्यावरील संपूर्ण केस गळून गेले आहेत अश्या कॅन्सरग्रस्त रुग्णाकरीता डोक्यावरील केसांचा विग तयार करण्यासाठी उपरोक्त विद्यापीठ व विद्यापीठांतर्गत महाविद्यालयातील मुली/महिला आपल्या केसांची एक बट दान करतील अशी संकल्पना हिन्दआयन फाऊंडेशनने व्यक्त केली आहे.

सदर उपक्रम दि. १५ फेब्रुवारी, २०२५ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे व दि.१६ फेब्रुवारी, २०२५ रोजी पोलिस मैदान, शिवाजी नगर, पुणे येथे भव्य स्वरुपात आयोजित करण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी उपरोक्त विद्यापीठांतर्गत महाविद्यालयातील मुली/महिला यांना आपल्या केसांची एक बट कॅन्सरग्रस्त रुग्णांसाठी डोक्यावरील केसांचा विग तयार करण्यासाठी दान करण्याबाबत प्रोत्साहित करण्यात यावे.

त्या अनुषगांने रासेयो कार्यक्रम समन्वयक यांनी उपरोक्त दिनांकास आपले विद्यापीठ व विद्यापीठांतर्गत महाविद्यालयातील मुली/महिला या उपक्रमात जास्तीत जास्त संख्येने सहभागी होतील अशा प्रकारचे नियोजन करण्यात यावे व या प्रकरणी आपल्यास्तरावरुन तात्काळ उचित कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यासनास पाठविण्यात यावा.

दि. १५ फेब्रुवारी, २०२५ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे आयोजित उपक्रमाबाबत माहिती व मार्गदर्शनास्तव प्रा.चित्रा लेले, सहा.प्राध्यापक,एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई. मोबाईल क्र. 9975639497 यांचेशी संपर्क करावा. तसेच दि.१६ फेब्रुवारी, २०२५ रोजी पोलिस मैदान, शिवाजी नगर, पुणे येथे आयोजित उपक्रमाबाबत माहिती व मार्गदर्शनास्तव डॉ.महारुद्र कापसे, सहा.प्राध्यापक, भारती विद्यापीठ, पुणे. मोबाईल क्र. 9823203016 यांचेशी संपर्क करावा.

**(डॉ. निलेश मो. पाठक )**
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना,

Dear Shri Nilesh sir,
Greetings!
Here are point of contact / information for hair donation event.

MUMBAI
Chitra Lele
Assistant Professor and Head Dept. of Political Sic, SNDT College of Arts and SCB College of Com and Sic for Women, Churchgate SNDT Women's University
Mobile: 9975639497

PUNE
Dr. Maharudra Kapse
Assistant Professor, Bharati Vidyapeeth's College of Engineering for Women, Pune - 411043
Mobile: 9823203016